महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg, Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

जा. क्र. : मअॅप/परीक्षा/ऑनलाईन परीक्षा प्रणाली/२०२६/९०१ दिनांक : २२/१०/२०२६

दरपत्रक मागणीपत्र

**विषय : ॲक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षा व पुरवणी परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यासाठी आवश्यक ऑनलाईन परीक्षा प्रणाली विकसित करणे, कार्यान्वित करणे व वर्षभर तांत्रिक सहाय्य पुरविण्यासाठी पुरवठादाराकडून दरपत्रके मागविण्याबाबत.**

**संदर्भ : वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मंत्रालय यांचे पत्र क्र. जा. क्र. MEDD-१४०२१(१)/११/२०२६/MMD(Adhi), दिनांक ९ ऑक्टोबर २०२६.**

महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेस शासनाने ॲक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यास परवानगी दिलेली आहे. सध्या परिषदेमार्फत प्रतिवर्षी प्रत्येक सत्राच्या दोन सत्र परीक्षा व दोन पुरवणी परीक्षा अशा एकूण चार परीक्षा ऑफलाईन पध्दतीने आयोजित करण्यात येतात. सद्यस्थितीत परिषदेकडे राज्यातील एकूण १९ पदविका अभ्यासक्रम चालविणा-या संस्था संलग्नीत असून एका संस्थेकडे ५० विद्यार्थी क्षमतेनुसार अधिकतम

सदर परीक्षा सुरळीत, पारदर्शक, सुरक्षित व कार्यक्षम पद्धतीने ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यासाठी आवश्यक संगणकीय प्रणाली विकसित करून देणे, ती कार्यान्वित करणे तसेच परीक्षा प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीत आणि वर्षभर आवश्यक तांत्रिक सहाय्य (Technical Support) उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने, सदर कामासाठी अनुभवी व सक्षम सेवा पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**१. कामाचे स्वरूप :**

नियुक्त करण्यात येणाऱ्या सेवा पुरवठादाराने खालीलप्रमाणे सेवा उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

१. ॲक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षा व पुरवणी परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यासाठी आवश्यक संपूर्ण ऑनलाईन परीक्षा प्रणाली विकसित करून उपलब्ध करून देणे.

२. विद्यार्थ्यांची नोंदणी, परीक्षा अर्ज, परीक्षेचे वेळापत्रक, प्रवेशपत्र, प्रश्नपत्रिका व्यवस्थापन, ऑनलाईन परीक्षा संचालन, उत्तर नोंदणी व मूल्यमापन यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे.

३. परीक्षा प्रक्रियेची गोपनीयता, सुरक्षितता, अचूकता व विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक तांत्रिक उपाययोजना करणे.

४. परीक्षेचे निकाल तयार करणे, निकालपत्रे व आवश्यक अहवाल उपलब्ध करून देणे तसेच परीक्षेसंबंधित अभिलेख सुरक्षितपणे जतन करण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.

५. परिक्षे दरम्यान विद्यार्थ्यांवर देखरेख,व्हिडीओ रेकॉर्डींग, संशयास्पद हालचालीची नोंद,व देखरेखीचा अहवाल (Online Examination proctoring Video log) उपलब्ध करुन देणे.

६. परिषदेकडून आवश्यकतेनुसार प्रणालीमध्ये बदल, सुधारणा व अद्ययावत सुविधा उपलब्ध करून देणे.

७. परीक्षा प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे.

८. प्रणालीचा वापर करण्यासाठी परिषदेकडील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देणे.

९. प्रणालीचे होस्टिंग, देखभाल, डेटा बॅकअप, माहितीची सुरक्षितता व प्रणालीचे नियमित कार्यान्वयन यासाठी आवश्यक व्यवस्था करणे.

१०. वर्षभरातील सत्र परीक्षा व पुरवणी परीक्षा यांसह आवश्यकतेनुसार परीक्षेसंबंधित तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे.

११. परिषदेस आवश्यक असलेली इतर पूरक तांत्रिक कामे परिषदेकडून देण्यात आलेल्या सूचनांनुसार पूर्ण करणे.

**२. दरपत्रकात नमूद करावयाच्या बाबी :**

१. ऑनलाईन परीक्षा प्रणाली विकसित करणे व कार्यान्वित करण्यासाठीचा एकरकमी खर्च.

२. वर्षभरासाठी प्रणालीचे होस्टिंग, देखभाल व तांत्रिक सहाय्य यांचा वार्षिक खर्च.

३. प्रत्येक सत्र परीक्षा व पुरवणी परीक्षेसाठी आकारण्यात येणारे स्वतंत्र सेवाशुल्क, लागू असल्यास.

४. प्रणाली विकसित करून कार्यान्वित करण्यासाठी लागणारा कालावधी.

५. सेवा कर (GST) लागू असल्याचा त्याचा तपशील

६. तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची पद्धत व कालावधी.

३. अटी व शर्ती :

१. पुरवठादाराने शॉप ॲक्ट नोंदणी, पॅन कार्ड, जीएसटी, तत्सम प्राधिकरणाकडील नोदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करावी.

२. पुरवठादारास संबंधित क्षेत्रातील किमान २ वर्षाचा पूर्वानुभव असणे आवश्यक.

३. प्रणाली विकसित करणे, तिची चाचणी घेणे व कार्यान्वित करणे ई. दिनांक २० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक असून परिक्षेची अंदाजित तारीख २५ नोव्हेंबर, २०२६ राहील.

६. परीक्षा प्रणालीची गोपनीयता, माहितीची सुरक्षितता व विद्यार्थ्यांच्या माहितीचे संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी नियुक्त सेवा पुरवठादाराची राहील.

७. प्रणालीच्या कार्यान्वयनानंतर वर्षभर आवश्यक देखभाल व तांत्रिक सहाय्य पुरविणे बंधनकारक राहील.

८. परिषद पहिल्यांदाच ऑनलाईन परिक्षा आयोजित करीत असल्याने विद्यार्थी,संस्था व परिषदेच्या कर्मचार-यांना या प्रणालीची सवय होण्यासाठी परिक्षेपुर्वी २-३ वेळा डेमॉन्सट्रेशन देणे बंधनकारक राहील.

९. दरपत्रक सादर केल्याने संबंधित सेवा पुरवठादारास काम देण्याचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.प्राप्त दरपत्रकांची छाननी करून सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

१०. आवश्यकतेनुसार प्राप्त दरपत्रकांबाबत स्पष्टीकरण मागविण्याचा तसेच प्रशासकीय कारणास्तव कोणतेही दरपत्रक स्वीकारणे किंवा नाकारणे याबाबतचा अधिकार परिषद राखून ठेवत आहे.

११. अंतिम निवड, कामाचे स्वरूप, कराराचा कालावधी व इतर अटी परिषदेकडून निश्चित करण्यात येतील.

**४. दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत :**

इच्छुक व पात्र सेवा पुरवठादारांनी आपले दरपत्रक कंपनी/संस्थेचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल, संबंधित अनुभवाचा तपशील आवश्यक दस्तावेजासह व अधिकृत स्वाक्षरीनिशी बंद लिफाफ्यात **"ऑनलाईन परीक्षा प्रणाली विकसित करणे व तांत्रिक सहाय्य पुरविण्यासाठी दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख करून दिनांक ३०/ १० /२०२६ रोजी सायंकाळी ६-०० वाजेपर्यंत महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई येथील कार्यालयात प्रत्यक्ष अथवा पोस्ट/कुरिअरद्वारे सादर करावे.

(नारायण नवले)
प्रबंधक,
महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई.